सोमवार दि.३ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
-अॅड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१३९ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


# गडी थोडक्यात हुकला,नाहीतर गाठले होते;मी 'हार कर भी बाजीगर'

## राम शिंदेंची रोहित पवारांवर टोलेबाजी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर (वृत्तसंस्था)**

विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांना टोला लगावला आहे. पुढची चार वर्षे विधानपरिषदेची आमदारकी असतानाही तुम्ही विधानसभेची निवडणूक का लढवली? असे लोक विचारत होती. पण ज्याने आपल्याला पाडले त्याला पाडायची इच्छाशक्ती दांडगी होती. गडी थोडक्यात हुकला, ती बी थोडा फार दगाफटका झाला म्हणून नाहीतर गाठले होते, असा टोला राम शिंदे यांनी रोहित पवारांना लगावला आहे.राम शिंदे म्हणाले, चांगले काम करणे हे वाईट असेट हे मला उशिरा कळाले. आमच्या मतदारसंघाचा माणूस भेटला नाही बाहेरून पाठवला. मागच्या वेळी ४३ हजार मतांचा फरक होता यावेळी १२४३ मताचा फरक राहिला. क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थितीत इंदापुरात सभापती राम शिंदे यांचा भव्य नागरी सत्कार पार पडला. यावेळी राम शिंदे बोलत होते. रोहित पवारांवर बोलताना राम शिंदे म्हणाले, ज्यांच्याकडून पराभव झाला ते २८८ मध्ये येतात आणि वरील सभागृहात ७८ आहेत असे ३६८ जण सभागृहात आहेत. राज्याला एक सभापती आहे तो सगळ्या आमदारांचा सभापती असतो. त्याच्यामुळे 'हार कर भी बाजीगर' अशी ती भानगड झाली आहे. काय त्यांच्यावर बेतली असेल तुम्हीच जाणून घ्या, असे राम शिंदे म्हणाले.आमच्या मतदारसंघातील लोक म्हणतात हजार पाचशे मते कमी पडली होती. यालाच दिली असती तर बर झाले असते, नाहीतर हे निवडून दिलं याचा काय उपयोग नाही आगे बी नाही आणि पीछे बी नाही, असाही टोलाही राम शिंदे यांनी रोहित पवारांना लगावला आहे. राज्यात नाही केंद्रात नाही, कामे होण्याची काही शक्यता नाही. कोणत्याही पार्टीकडून काम आणले तर कोणी एकले तर मी सध्या तीनही



पक्षाचा सभापती आहे, असे राम शिंदे म्हणाले. लोक म्हणतात राम शिंदे नशीबवान आहे, मी तर नशीबवान आहेच. कारण पण पडलो तरीही आमदार झालो, सभापती झालो. जे पडले आहेत त्यांची काय अवस्था आहे. राज्यातील सगळी लोकं म्हणतात येऊ का? २८८ मध्ये २४० आमदार सत्तेत आहेत. महाराष्ट्रात विरोधी पक्षनेता राहिला नाही, विरोधात राहून करतील काय? निवडून आलेल्या २४० मधील ४२ मंत्री आहेत, १९८ आमदार आहेत आणि मी सभापती आहे असेही राम शिंदे म्हणाले. मी झोपल्यावर कधी कधी विचार करतो, आपले बरे झाले का वाईट झाले. जरी निवडून आलो असतो तरी ४२ मध्ये मिळाले असता की नाही तो वेगळाच भाग असल्याचे राम शिंदे म्हणाले.राम शिंदे म्हणाले, मला तालुकाध्यक्ष होण्यास १० वर्षे लागली. विधान परिषदेचा सभापती व्हायला मला अडीच वर्षे लागली. विधान परिषदेला १०० वर्ष झाली आहेत. माझ्या एवढ्या तरुण माणसाला पहिल्यांदा सभापतीपद मिळालं आहे. कारण ते वरिष्ठ आणि ज्येष्ठांचं सभागृह आहे. पण कनिष्ठांना संधी मिळाली. आमदाराला आठ फेऱ्या विमानाच्या फुकट आहेत, सभापतीला कंटाळा येईपर्यंत आहेत. मंत्रालयात कोणत्या मंत्र्यांनी आमदाराने नागरिकांना दालनात यायला पास नाही दिला तर थेट मला फोन करा, कारण पास मीच देतो. सगळ्या आमदारांच्या पगारावर सह्या माझ्या आहेत, असेही राम शिंदे यावेळी म्हणाले.

# महागाव येथील एल.के.हायर सेकंडरी विद्यामंदिरात स्नेह संमेलन थाटात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागाव । विजय थोरात**

एल . के .हायर सेकंडरी विद्यामंदिर महागांव यांच्या वतिने दरवर्षी प्रमाणे नाविन्य पुर्ण वर्षिक स्नेह संमेलन ' विवित्सा २०२५ ' चे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे उद्घाटन महागांव च्या नगरअध्यक्षा सौ .सुनंदा दिलीपराव कोपरकर यांच्या हस्ते रिबीन कापून करण्यात आले तर प्रमुख अतिथी धनराज निळे पोलीस निरीक्षक महागांव , भास्कर पंडागळे सेवानिवृत्त पोलीस अधिकारी,वनपरिक्षेत्राधिकारी धनंजय व्यवहारे,राष्ट्रवादी शहर अध्यक्ष स्वप्निल अडकिने ' ,उद्योजक प्रविण राऊत ,महागाव तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय कोपरकर कार्यक्रमाचे अध्यक्ष गोविंदराव जी तास्के संस्थापक




(सेवानिवृत परिवहन अधिकारी ) यांनी भुषविले प्रमुख उपस्थिती उद्योजक प्रवीणभाऊ राऊत ,उद्योजक रामेश्वर काळे श्रपोलीस पाटील आमणी (बु ) सौ .नंदाताई तास्के, आमणी( खु) जनुना. कोमल ताई थोरात उपसरपंच .सौ.अदिती तास्के यांनी दिप प्रज्वलन केले कार्यक्रमाला सुरुवात झाली विद्यार्थ्यांनी आपल्या कलाविष्कारांचे उत्कृष्ट रित्या सादरीकरण केले भारतीय लोकगीते ,देशभक्तीपर ,गीते महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख ,सामाजिक विषयावर बेटी बचाव बेटी पढाव एकांकिका विविध प्रकारची नृत्याविष्कार गीत गायन अशा वैविध्यपूर्ण कार्यक्रम सारीकरण केले पालक वर्ग व रसिक प्रेक्षक यांना त्यांनी मंत्रमुग्ध झाले .

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य आर . एस .भोणे सर सुत्र संचालन राठोड सर व शिरगिरे मॅडम यांनी केले . तर कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी के.एस .दिग्गल सर उपप्राचार्य ,वाघमारे सर राठोड सर उचेगावकर सर,खडसे सर ,बनसोडे सर , व्ही .व्ही . राऊत सर ,अडकिने (देशमुख ) मॅडम , शिरगिरे मॅडम ,कलाने (नरवाडे ) मॅडम ,डहाळे मॅडम ,

पोहाणे मॅडम ,साळवे मॅडम ,गोरे मॅडम ,गौळकर मॅडम,कावळे मॅडम ,सूर्यवंशी मॅडम, रंधे मॅडम , ठाकरे मॅडम ,लिपिक अजय पिंगाणे खंदारे ताई पानपट्टे ताई शिरडकर ताई यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इंगोले सर यांनी केले .

# रामकृष्ण परमहंस वाचनालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाचा समारोप



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

भोकर प्रतिनिधी:- येथील रामकृष्ण परमहंस सार्वजनिक ग्रंथालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून वाचन संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम गेल्या पंधरवड्यापासून राबविण्यात येऊन त्याचा समारोप विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

या समारोपाच्या अनुषंगाने वाचनालयात ग्रंथप्रदर्शन,परिसंवाद मेळावा व तसेच पुस्तकांचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी ग्रंथालयाचे पदाधिकारी वेणू पाटील कोंडलवार,बालाजी पिंगलवाड, तालुका ग्रंथपाल शिवाजी सूर्यवंशी,नरेश बीजमवार, ग्रंथपाल दिनेश लक्षटवार व वाचकांची आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शहीदांच्या स्मारका संदर्भात होत असलेली अवहेलना थांबली

# तरी सुद्धा खूप काही मिळाले असे म्हणता येईल-अॅड.डॉ.विजयकुमार कस्तुरे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चिखली । ज्ञानेश्वर बुधवत**

नुकत्याच पार पडलेल्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने भीमनगर, चिखली, जि. बुलढाणा येथील, इ. स. २००७ मधे सीमेवर कर्तव्य बजावत असताना ऐन तारुण्यात

जीवाचे बलीदान करणाऱ्या शहीद विजय लक्ष्मण भिसे यांच्या स्मारकस्थळी दरवर्षीच्या शिरस्त्याप्रमाणे या चौदाव्या वर्षी सुध्दा भावपूर्ण श्रद्धांजली वाहून अभिवादन करताना, क्वचितच आणि एखाद्याच शासकीय अधिकारी किंवा पुढारी तसेच जनप्रतिनिधी यांना हौतात्म्य पत्करलेल्या शहीदांच्या स्मारकाची आठवण राहते, हे वास्तव मांडत असताना आपल्या मनातील खदखद, सामाजिक कार्यकर्ते डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट यांनी वरील शब्दात व्यक्त केली. आणि सोबतच स्थानिक प्रशासनाने स्मारकाच्या दयनीय अवस्थेकडे अन् व्यवस्थेकडेही लक्ष देण्यात कुचराई करू नये हाही कटाक्ष टाकण्यास ते विसरले नाहीत.या प्रसंगी माजी सुभेदार दौलतराव बोर्डे, हमाल मापारी संघटनेचे गजानन जाधव, सामाजिक सेवाभावी देवेंद्र वानखेडे, विश्वकर्मा संघटनेचे मनोज शर्मा, भावकवी, अंकुश पडघान, बडगुजर समाज संघटनेचे रविंद्र शालेशा, रणजित शालेशा, शहीद माता सुभद्राबाई भिसे, शहीद बंधू संजय भिसे, सौ. मंदा भीसे, सविता भिसे, इंदूबाई साबळे, द्वारकाबाई हिवाळे इ. उपस्थित होते.

# तरुणाची तलावात उडी मारून आत्महत्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर । राजकिरण देशमूख**

शहरातील श्री देवेश्वर संस्थानच्या पायथ्याशी असलेल्या पौराणिक भोजंती तलावाच्या शेजारी राहणाऱ्या तरुणांने आत्महत्या करण्याचे उद्देशाने बुधवारी तलावाच्या पाण्यात उडी घेतली होती शोधाशोध करूनही शव मिळाले नसल्याने आज सकाळी मॉर्निंग वॉक साठी गेलेल्या नागरिकांना त्याचे शव तलावाच्या पाण्यावर तरंगताना दिसल्याने घटना पोलीस ठाण्याचे सपोनी शिवप्रकाश मुळे यांना कळविल्याने दि १ रोजी १० वाजता पोलिसांनी स्थानिक आणि नातेवाईकांच्या मदतीने शव बाहेर काढत माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात नेले असता येथे शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिले



माहूर शहरातील भोजंती तलावाच्या शेजारी राहणारा भारत रामकृष्ण राठोड वय २५ वर्षे हा गावातील दुकानात काम करत होता प्रकृती बरी राहत नसल्याने अनेक दिवसापासून तो घरीच राहत होता त्यास तीन भाऊ एक बहीण आई-वडील आहेत तलावाचे शेजारी राहत असल्याने त्याने बुधवार दि २९ रोजी सायंकाळी आठ वाजताच्या सुमारास त्याने तलावाच्या पाण्यात उडी घेतली होती सदरील घटना येथील मंदिरावर आलेल्या भाविकांनी पाहून स्थानिकांना सांगितले त्यावरून रामकृष्ण राठोड यांनी माहूर पोलिसात तशा प्रकारची फिर्यादी दिली होती दोन दिवस शोध घेऊनही भारत चेशव मिळाले नसल्याने शेवटी दि १ रोजी सकाळी तलावाच्या किनाऱ्यावरून मॉर्निंग वॉक करत असताना नागरिकांना त्याचे शव दिसल्याने त्यांनी पोलिसांना घटनेची खबर दिली त्यावरून स पो नी शिवप्रकाश मुळे पोहेका गजानन चौधरी यांनी तात्काळ घटनास्थळ गाठून मयत भारत चे शव स्थानिक व नातेवाईकांच्या मदतीने बाहेर काढून शव विच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात आणले

ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर वाठोरे यांनी शव विच्छेदन केले मयत भारतच्या बहिणीच्या फिर्यादीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद पोलीस ठाण्यात घेण्यात आली असून तलाव मोठा झाल्याने त्यामध्ये पाणी मोठ्या प्रमाणात साधले असून येथे तलाव झाल्यापासून दोन आत्महत्या झाल्याने नगरपंचायत प्रशासनाने येथे तात्काळ बोटची व्यवस्था करावी अशी मागणी होत आहे-

# उद्धव ठाकरेंनी वर्षा बंगला सोडल्यावर तिथे टोपलीभर लिंबू सापडले:काळी जादू काय असते त्यांनाच विचारा-रामदास कदम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

उद्धव ठाकरे यांनी वर्षा बंगला सोडला तेव्हा बंगल्यावर टोपलीभर लिंबू सापडले होते, तसे एकनाथ शिंदे यांनीच मला सांगितले होते, असे म्हणत शिवसेना नेते रामदास कदम यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. देवेंद्र फडणवीस वर्षा बंगल्यावर का जात नाही, याचे उत्तर काळ्या जादूवल्याने द्यावे, माझ्या नादाला लागू नका, असा इशारा ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी दिला आहे. यावर प्रत्युत्तर शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी दिले आहे.

रामदास कदम म्हणाले, काळ्या जादूबद्दल बोलू नका. काळी जादू काय असते हे उद्धव ठाकरे यांनाच विचारा. उद्धव ठाकरे यांनी वर्षा बंगला सोडला तेव्हा बंगल्यावर टोपलीभर लिंबू सापडले होते, असे एकनाथ शिंदे यांनीच सांगितले होते. उद्धव ठाकरे बुके घेऊन फडणवीस यांना भेटायला जातात. आणि दुसऱ्या बाजूला अमित शाह यांना अफजल खान म्हणतात. देवेंद्र फडणवीस आणि शिंदे यांच्यात मतभेद कसे निर्माण होतील हा त्यांचा हेतू आहेत.रामदास कदम यांनी यांनी दैनिक सामनातून करण्यात आलेल्या टीकेचाही समाचार घेतला. काही लोकांना ऐकायला येत नसेल. काही लोकांचे डोळे बंद असतील, काहींचे कान बंद असतील. झोपलेल्यांना जागे करू शकतो. पण झोपण्याचे सोंग घेतलेल्यांना जागे करू शकत नाही. सामनातील बातम्या झोपेचे सोंग घेऊन केलेल्या बातम्या आहेत.

# संपादकीय..

## कोकणातील गुलाबी थंडी अन् चुलीची धग

लोकनेता न्यूज नेटवर्क

निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केलेला प्रदेश म्हणजे कोकण. कोकणातील सौंदर्य थंडीतच अधिक खुलतं. सध्या कोकणात हुडहुडी भरणाऱ्या थंडीची चाहूल दिली आहे. उशिरा का होईना पण कोकणात दाट धुकं पडायला लागले आहे. पण यासाठी डिसेंबरची वाट पाहावी लागली आहे. पण याच थंडीच्या चाहुलीने सध्या कोकणातला निसर्ग खुलला आहे. कोकणातल्या घाट रस्त्यात धुके पाहायला मिळते आहे. अशावेळी कोकणातील गुलाबी थंडी अन् चुलीची धग म्हणजे एक ऊब देणारी ठरते.

ोकणामध्ये मागील सात-आठ वर्षांपासून कडक थंडीसाठी डिसेंबर महिन्याची वाट पाहावी लागते. विशेष म्हणजे कडाक्याच्या थंडीत कोकण अधिक खुलून दिसतो. त्यात सकाळचे दाट धुके असल्याने अवकाशात आल्यासारखे वाटते. तसेच गावच्या वाटा, डोंगर व रस्त्ये धुक्यामुळे झाकले जातात. तेव्हा केव्हा एकदा सकाळ होते आणि चुलीची धग घेतो असे रात्री थंडीची हुडहुडी भरणाऱ्या प्रत्येकाला वाटत असते. त्यासाठी कोकणातील कडाक्याची गुलाबी थंडी आणि चुलीचा धग घेण्यासाठी जरूर हिवाळ्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यात भटकंती करायला या. अलीकडच्या काळात पर्यटक नाताळच्या सुट्टीत गोव्याला जाण्याऐवजी सिंधुदुर्ग जिल्ह्याला अधिक पसंती देतात. कोकणात हिवाळ्यात आल्यावर कशी थंडगार आणि बोचरी गुलाबी थंडी लागते आणि कशाप्रकारे पेटलेल्या चुलीच्या धगाचा आसरा स्थानिक नागरिक घेत असतात हे आल्यावरच पाहायला मिळेल. त्याची मजा काही कोकणात वेगळीच असते. त्यासाठी निसर्गरम्य कोकणात थंडीच्या दिवसात यावे लागेल. त्याच वेळी समजेल की, ज्यावेळी दातावर दात आपटतात तेव्हा गुलाबी थंडी कशी असते याचा प्रत्ययास पाहायला मिळेल. तसेच बोचरी थंडी कशी असते हे सावंतवाडी तालुक्यातील अत्यंत सुंदर व निसर्गरम्य पर्यटन असणाऱ्या आंबोली गावी गेल्यावर अनुभवता येईल. त्याचमुळे देशातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून १९९९ साली सिंधुदुर्ग जिल्हा जाहीर करण्यात आला. सध्या पर्यटकांचा वाढता कल सिंधुदुर्ग जिल्ह्यात दिसून येतो. त्यासाठी सरकारने पर्यटन स्थळांच्या विकासासाठी अधिक लक्ष दिले पाहिजे.

नैसर्गिक सौंदर्य लाभलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गुलाबी थंडी आणि चुलीचा धग याचे अतूट नाते आहे. आता जरी चुलीची जागा गॅसने घेतली तरी आजही जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी चुलीचे अस्तित्व टिकून ठेवले आहे. त्यामुळे पर्यटक खानावळीत जेवायला गेल्यावर चुलीवरच्या जेवणाला अधिक पसंती देतात. सध्याच्या युगात जेवणाचे पार्सल जरी घरी आले तरी आजही चुलीचे अस्तित्व अबाधित आहे आणि उद्याही अबाधित राहणार आहे. हीच खरी कोकणची ओळख आहे. चुलीवरच्या जेवणाची चवच काही भारी असते. त्यामुळे पर्यटक जास्त आकर्षित होत असतात. तसेच चाकरमानी आपल्या जिल्ह्यातील गावी आल्यावर जुने ते सोने म्हणत जरी ओली लाकडे असली तरी चुलीत आग पेटवून जेवण करतात.

बऱ्याचवेळा ग्रुपने जिल्ह्यात नागरिक एकत्र येतात. गारठ्यात थंडीच्या वेळी थंडीपासून बचाव करण्यासाठी शेकोटी पेटविली जाते. काहीवेळा जिल्ह्यातील शाळेतील मुलांचे शिबीर याच मोसमात आयोजित केले जाते. त्यावेळी सुद्धा मुले थंडीपासून संरक्षण करण्यासाठी आसपासची सुखी लाकडे गोळा करून रात्रीची शेकोटी पेटवून धग घेत असतात. अशा वेळी मुलांची करमणूक म्हणून मुलांचे दोन ग्रुप तयार करून गाण्यांच्या भेंड्या सुद्धा लावल्या जातात; परंतु शेकोटीपेक्षा चुलीच्या धगाची काही वेगळीच मजा असते. थंडीमध्ये चुलीतील धगाने आपण गरम शेक घेतो. गारठलेले पायाचे तळवे धगावर शेकले जातात. त्यामुळे पायांना ऊब मिळते. तसेच चुलीतील धगावर हाताचे तळवे गरम करून आपल्या गालाला लावले जातात. त्याची मजा काही औरच असते. अशा घटना जीवनात कधीही विसरू शकत नाही. एक प्रकारे चुलीतील धग ऊर्जा देत असतो. त्यातून आपल्याला बरेच काही तरी शिकता येते. इतकी ताकद चुलीतील धगामध्ये आहे.

कडाक्याच्या थंडीत आम्ही भावंडे लहान असताना आयेन (आई) चुलीत धग पेटवल्यान काय हळूच अंगाभोवती गोधडी गुंडाळून धगाक बसायचो. नंतर लाकडा जळाक लागली काय आये म्हणायची मागे बसा. किटाळ उडात! इतकी काळजी आये घ्यायची. त्यासाठी वडील आदल्या दिवशी लाकडाचे भेतळे फोडून ठेवत असत. तेव्हा धग थंडीसाठी रामबाण उपाय आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. धगामुळे कोणत्याही प्रकारची पायाला फूट लागत नाही किंवा पायाचे गुडघे दुखत नाही. सध्याच्या युगात धगापासून तरुण मंडळी दूर जात असल्याने गुडघे दुखी अधिक प्रमाणात जाणवत आहे. तेव्हा थंडीच्या दिवसात चाकरमानी कधीही गावाक इलो काय सकाळी उठल्यावर मागच्या पडवीत मडक्याखाली आग घातलेली असते त्याच्या धगाक जाऊन आंगमास शेकताना दिसता. तोच नंतर दुपारी सांगता मुंबईक फेनाची हवा घेऊन शरीरात हवा भरली आसा तेव्हा सकाळी सकाळी धग घेतल्यामुळे घाम इलो. अंग कसा कडक झाला. असे अनेक किस्से चाकरमानी मुंबईक जाईपर्यंत रंगू लागतात.सध्या काही ठिकाणी कोकणातील थंडीतील निसर्गाचा आनंद घेण्यासाठी निसर्गप्रेमी सुद्धा येत असतात. अनेक तरुण मंडळी आपल्या बाईकने कोकणातील डोंगरदऱ्या पाहण्यासाठी येतात. थंडीमुळे दाट धुके पसरलेले दिसते. त्यात रस्त्यावरील नागमोडी वळणे यात काहीवेळा धुक्यामुळे वाहन सोडा समोरील रस्ता सुद्धा दिसत नाही. त्यामुळे पुढे रस्ता हरवला काय असे मनात येते. मात्र तो लपवाछपवीचा डाव असतो. स्थानिक नागरिक लाल परीचा काळ सुखाचा म्हणत लालपरीने जाणे पसंत करतात. तेव्हा सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोकणातील गुलाबी थंडी अनुभवण्यासाठी आणि चुलीच्या धगाचा आनंद लुटण्यासाठी पर्यटन जिल्हा असणाऱ्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात येवा.

# पत्रकारांच्या प्रश्नासाठी पुन्हा रस्त्यावर उतरून आंदोलन करणार

### मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांचा इशारा,सेलू येथे आदर्श जिल्हा, तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व अध्यक्षांचा मेळावा उत्साहात





लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

'पत्रकारांच्या प्रश्नासाठी मराठी पत्रकार परिषदेने सातत्याने पाठपुरावा केला. पत्रकारांच्या संरक्षणासाठी कायदा व्हावा, यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलने केली. अखेर सरकारने २०१७ मध्ये पत्रकार संरक्षण कायदा केला. पण प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. कारण या कायद्याचे नोटिफिकेशन निघाले नाही. पत्रकार संरक्षण कायद्यासह सरकार पत्रकारांच्या इतर प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा मराठी पत्रकार परिषद राज्यभर रस्त्यावर उतरून पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी आंदोलन करणार आहे,' असा इशाराच परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी दिला.

मराठी पत्रकार परिषद आयोजित रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व अध्यक्षांचा मेळावा परभणी जिल्ह्यातील सेलू येथे एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. यावेळी देशमुख बोलत होते.याप्रसंगी परिषदेचे विश्वस्त किरण नाईक,शरद पाबळे,अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, प्रमुख वक्ते तथा प्रसिद्ध निवेदक विशाल परदेशी,स्वागताध्यक्ष विनोद बोराडे,परिषदेचे कार्याध्यक्ष शिवराज काटकर,सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे,कोषाध्यक्ष मन्सूर शेख, राज्य प्रसिद्धीप्रमुख संदीप कुलकर्णी, सह प्रसिद्धीप्रमुख भरत निगडे, महिला आघाडी अध्यक्षा शोभाताई जयपूरकर,डिझिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे,परिषदेचे उपाध्यक्ष प्रकाश कांबळे,विभागीय सचिव रवी उबाळे,सचिन शिवशेट्टे, अशोक काकडे,उप विभागीय अधिकारी

संगीता सानप,माजी नगराध्यक्ष हेमंत आढळकर,परिषदेचे परभणी जिल्हाध्यक्ष प्रभू दिपके,परभणी जिल्हा सरचिटणीस मोहम्मद इलियास, सेलू तालुका पत्रकार संघ अध्यक्ष लक्ष्मण बागल यांच्यासह राज्याच्या विविध भागातून आलेले पत्रकार उपस्थित होते.

'राज्य सरकारने पत्रकारांसाठी पेन्शन योजना सुरू केली. आरोग्य योजना सुरू केल्या. पण प्रत्यक्षात या योजनांचा लाभ घेताना अनेक अडचणी येत आहेत,' असे सांगतानाच देशमुख म्हणाले, 'समाजाच्या पत्रकारांकडून १०० अपेक्षा करतात. पण अडचणीच्या वेळात समाजाने देखील पत्रकारांच्या पाठीशी उभे राहावे,अशी अपेक्षा असते.मात्र पत्रकाराच्या अडचणीच्या काळात कोणी उभे राहत नाही.पण यापुढे महाराष्ट्रातील एकही पत्रकार एकाकी पडणार नाही,यासाठी मराठी पत्रकार परिषद काम करीत आहे. तशी रचनाच आपल्या संघटनेची आहे.मराठी पत्रकार परिषद ग्रामीण भागात पुरस्कार वितरण सारखे उपक्रम घेण्यामागे मोठा उद्देश आहे. कारण ग्रामीण जीवन, संस्कृती, प्रश्न यासर्वाची जाण पत्रकारांना होणे महत्त्वाचे आहे.राज्यातील ३५६ तालुक्यात आपल्या परिषदेचे अस्तित्व आहे. सामाजिक बांधीलकी जपत परिषद काम करीत आहे. पण ग्रामीण भागातील पत्रकारांचे प्रश्न तितक्याच ताकतीने मानण्याचे काम आता करणे गरजेचे असून याबाबत लवकरच परिषद भूमिका जाहीर करेल,'असेही देशमुख यांनी सांगितले.देशमुख पुढे म्हणाले, 'पत्रकार अधिस्वीकृतीचे नियम ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी खूप कडक आहे.याबाबतीत विचार करण्याची वेळ आली आहे.त्यामुळेच पत्रकारांच्या हक्काची चळवळ पुढे नेण्यासाठी आगामी काळात अधिक व्यापकतेने,जोमाने परिषद काम करेल,' असेही देशमुख यांनी स्पष्ट केले.याप्रसंगी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे विशाल परदेशी यांनी पत्रकारिता क्षेत्रात काम करताना माणसे जोडा,'असा मोलाचा सल्ला देत सांगितले की,'आजच्या कार्यक्रमाला उत्तर महाराष्ट्र,कोकण, मध्य महाराष्ट्र,पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा अशा विविध भागातून पत्रकार आलेत.मराठी पत्रकार परिषद या मातृसंस्थेच्या एक भाग आहे,याचा मला अभिमान आहे. ग्रामीण भागातील पत्रकाराकडे जेवढी माहिती असते,तेवढी शहरी भागातील पत्रकारांना नसते.चांगला फिल्ड रिपोर्टर हा उत्तम अँकर होऊ शकतो.बेधडकपणे व्यक्त होण्यास प्राधान्य द्या. असे बोला जे तुमच्या आईला समजेल, असे प्रश्न विचारा जे तुमच्या आईला समजतील. आयुष्यात आपल्याला जमिनीवर आणणारी माणसे असावीत.तरच माणूस माणसात जाऊन उत्तम मिसळू शकेल. पत्रकारिता क्षेत्रात प्रत्येक क्षण स्पर्धेसारखा असतो,आणि या स्पर्धेत आपण टिकणे गरजेचे आहे.पण आपण कोणतीही बातमी देताना शब्दांचे भान फार महत्त्वाचे आहे. घरातील महिला जेव्हा घर सांभाळते, तेव्हाच पत्रकारीतेचे व्यसन पूर्ण होऊ शकते.तसेच पत्रकारिता करताना आरोग्य जपणे महत्त्वाचे आहे.ब्रेकिंग न्यूज मिळवण्याच्या नादात नाही ते धाडस ते करू नका.धाडस कोणत्या गोष्टीचे करावे,हे देखील समजून घेणे गरजेचे आहे.स्वतः ला जपा,कुटुंबाला जपा.कारण आपले कुटुंब आहे तरच आपण आहोत,' असेही परदेशी यांनी सांगितले.मिलिंद अष्टीवकर म्हणाले की,'मराठी पत्रकार परिषद १०० वर्षाकडे वाटचाल करीत आहे. पत्रकारांसाठी ग्रामीण भागात कार्यक्रम घेतल्याने तेथील पत्रकारांना एक बळ मिळते.' राज्यभरातून आलेल्या पत्रकारांचे स्वागत याप्रसंगी स्वागताध्यक्ष विनोद बोराडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परभणी जिल्हा सरचिटणीस मोहम्मद इलियास यांनी तर सूत्रसंचालन सुभाष मोहकरे यांनी केले.आभार रेवणआप्पा साळेगावकर यांनी मानले.मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारा स्व. वसंतराव काणे आदर्श पत्रकार संघ जिल्हा पुरस्कार अकोला जिल्हा पत्रकार संघाला देण्यात आला.तर आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार कणकवली तालुका पत्रकार संघ (कोल्हापूर विभाग), बुटीबोरी तालुका पत्रकार संघ (नागपूर विभाग), सेलू तालुका मराठी पत्रकार संघ (छत्रपती संभाजीनगर विभाग),पिंपरी चिंचवड तालुका पत्रकार संघ (पुणे विभाग), शहादा तालुका पत्रकार संघ (नाशिक विभाग),उमरगा तालुका पत्रकार संघ ( लातूर विभाग),खामगाव प्रेस क्लब (अमरावती विभाग) , चिपळूण तालुका पत्रकार संघ (कोकण विभाग) यांना देण्यात आला.पत्रकारिता क्षेत्रांमध्ये विशेष योगदान देणाऱ्या पत्रकारांचा सेलू येथील कार्यक्रमांमध्ये गौरव करण्यात आला. यामध्ये आसारामजी लोमटे (साहित्यिक तथा ज्येष्ठ पत्रकार), डी व्ही मुळे (ज्येष्ठ पत्रकार), कांचनजी कोरडे (ज्येष्ठ पत्रकार) यांचा गौरव केला गेला. तर, सेलू येथील तरुणी शेख अलिना शेख मुनीर हिची इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये निवड झाल्याबद्दल तिचा सन्मान करण्यात आला.

# तुमची आर्थिक समृद्धी रोखणाऱ्या सवयी

लोकनेता न्यूज नेटवर्क



प्रत्येक व्यक्ती निश्चित हेतूने गुंतवणूक करीत असते. या हेतूमध्ये अनेकदा आपल्याला खरंखुरं आर्थिक स्वातंत्र्य मिळावं, खर्च करताना पैसे आपल्या मर्जीनुसार करता यावेत अशी त्यांची अपेक्षा असते. कोणतीही गुंतवणूक स्वतः न करता अनपेक्षितपणे काहीजण श्रीमंत बनतात. त्यांच्याकडे केवळ भरपूर पैसे आहेत म्हणून आपण त्यांना श्रीमंत असे म्हणू शकतो, समृद्ध नव्हे. असलेले पैसे योग्य रीतीने गुंतवणूक करून वाढवता आले किंवा त्यात भर घालता आली नाही तरी निदान ते सांभाळता येईल एवढे किमान कौशल्य आपल्याकडे असेल, तर आर्थिकदृष्ट्या आपण खरोखरच समृद्ध झालो असे म्हणता येईल. हा मार्ग वाटतो तितका सोपा नाही. त्यात अनेक अडथळे आहेत. आपल्या अनेक आर्थिक सवयी या आपल्याला मध्यमवर्गातच ठेवतात अथवा त्याकडे ढकलतात, त्यांचा थोडक्यात आढावा घेऊ या.

कोणतेही निश्चित आर्थिक ध्येय नसणे - अनेक व्यक्ती अशा आहेत त्यांच्यापुढे कोणतेही आर्थिक ध्येय नसते. त्यामुळे बचत किंवा त्यापुढे जाऊन गुंतवणूक करावी असे त्यांना वाटतच नसल्याने त्यांना समृद्धी सोडाच श्रीमंतही होता येत नाही. तेव्हा आर्थिक दृष्टीने समृद्ध व्हायचं असेल तर आपले उद्दिष्ट असणे आणि ते पूर्ण करण्याचे प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्वतःच्या आर्थिक उद्दिष्टांना प्राधान्य न देणे-काही व्यक्ती अशाही आहेत ज्यांच्याकडे निश्चित आर्थिक उद्दिष्ट आहे; परंतु त्यांचा प्राधान्यक्रम गरजा आणि चैन यासाठी खर्च करण्याकडे आहे. त्यामुळे ते पुरेशी गुंतवणूक करू शकत नाहीत, आर्थिकदृष्ट्या समृद्ध होऊ शकत नाहीत. फारच थोडे लोक उद्दिष्टांवर लक्ष ठेवून प्रथम बचत अथवा गुंतवणूक करतात. मिळालेल्या पैशाचे नियोजन करून गुंतवणूक केल्यास, राहिलेले पैसे परिस्थितीनुसार खर्च कसे करायचे ते आपोआप समजत जाईल.

अनावश्यक कर्ज घेणे - आर्थिक क्षेत्रातील स्पर्धेमुळे सध्या कुणालाही सहज कर्ज उपलब्ध होत आहे. त्यासाठी कोणतेही तारण ठेवावे लागत नसल्याने, अनेकदा अनावश्यक कारणांसाठी कर्ज घेतले जाते. स्वतःला राहण्यासाठी घर, उच्च शिक्षण, व्यवसायाची वृद्धी यासाठी घेतलेले कर्ज हे आवश्यक कर्ज म्हणता येईल. घर आणि उच्च शिक्षण हे गरजेचे; परंतु आता आवाक्यातील नसलेले त्यामुळे कर्ज घ्यावे लागणे अपरिहार्य आहे. व्यवसाय वृद्धीसाठी घेतलेल्या/ कर्जातून भविष्यात उलाढाल होईल, वाढीव परतावा मिळू शकतो म्हणून ते कर्ज आवश्यक कर्ज समजावे. याउलट चैनीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी घेतलेले कर्ज अनावश्यक म्हणता येईल. अनेकदा यासाठी हप्ता (एचख) किती पडेल हे सांगितले जाते. त्याकडे पाहून कर्ज खूप क्षुल्लक वाटू शकते. यासाठी व्याज द्यावे लागते. वरचेवर सहज उपलब्ध असणारे कर्ज घेतल्यास कर्ज फेडण्यासाठी नवे कर्ज अशी परिस्थिती निर्माण होऊन तुमची वाटचाल दिवाळखोरीकडे सुरू होते. पुरेसा राखीव निधी नसणे - अचानक काही आर्थिक संकट आलं, जसे मोठे आजारपण, अपघात, नोकरी जाणे अशा परिस्थितीत काही नियमित खर्च हे करावेच लागतात. त्यांना पर्याय नसतो. स्वतःकडे ६ ते १२ महिने खर्चास पुरेल एवढा निधी असेल आणि तो सहज काढून घेता येत असेल तर तो उपयोगी पडतो. नाहीतर अधिक व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. उधार उसनवारी करावी लागते. असा निधी निर्माण करून आपली आर्थिक स्थिती मजबूत राहते. कुणाकडे हात पसरावे

लागत नाहीत. उत्पन्न, खर्च, मालमत्ता, दायित्व किती ते माहिती नसणे - कोणतेही आर्थिक उद्दिष्ट नसलेल्या व्यक्तींना या गोष्टी माहिती नसतात. याचा वेळोवेळी आढावा घेऊन त्याप्रमाणे गुंतवणूक निर्णय घेण्याची सवय असल्यास त्यातील अनावश्यक गोष्टी टाळता येतात. आवश्यक तरतुदी/धोरणात्मक बदल करता येतात. आर्थिक नुकसान करणाऱ्या महाग सवयी - अपवादात्मक प्रसंगीच क्षम्य असलेल्या आणि अलीकडे सर्रास अंगवळणी पडलेल्या काही सवयी उदा. हॉटेलिंग करणे, तत्काळ कोट्यातून प्रवास तिकीट काढणे, शेवटच्या क्षणी सहलीस निघणे, आयत्या वेळी विमानाचे तिकीट काढणे, बाहेर खाणे, ब्रॅण्डेड वस्तूच खरेदी करणे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याऐवजी खासगी वाहतुकीचा वापर करणे, सुजाण ग्राहक हा नेहमी जागृत असायला हवा. त्याने योग्य दर्जा आणि वाजवी किंमत (स्वस्त नव्हे) यांचा स्वतः नियमित शोध घ्यावा आणि नियोजन करावे. अगदीच नाईलाज असेल तरच अन्य पर्याय आजमावेत. गुंतवणूक न करता केवळ त्यांच्या संधी शोधत बसणे - गुंतवणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध असताना विशिष्ट पर्यायाची वाट पाहण्यासाठी अनेकजण आपले पैसे तसेच बचत खात्यात ठेवतात. त्यामुळे गुंतवणूक न होता नुकसानच होते. फार काळ पैसे तसेच गुंतवणूक न करता ठेवण्याऐवजी आपल्याकडे एकच पर्याय नसून अन्य पर्यायही माहिती असायला हवेत.

कर आकारणी सवलती संबंधित माहिती नसणे - भांडवल बाजाराशी संबंधित अनेक गुंतवणूक प्रकार आहेत, त्यावर करसूट आणि सवलतीच्या एकसमान दराने कर आकारणी होते. अनेकांना हे माहिती नसल्याने ते आपली गुंतवणूक अन्य प्रकारात करून त्यावर कर देतात. प्राथमिक आर्थिक विषयांची कमी माहिती - आर्थिक संबंधात अशा अनेक प्राथमिक गोष्टी म्हणजे उद्दिष्ट, अंदाजपत्रक, देखभाल खर्च माहीत असतील तर योग्य पर्याय गुंतवणूकदार निवडू शकतात. उदा. घर, गाडी विकत घेणे याऐवजी भाड्याने घेणे. असलेले घर/ गाडी बदलून मोठे घर, आलिशान गाडी घेण्याचे फायदे / तोटे हे माहीत असेल तर योग्य तोच खर्च केला जातो. सहज सुचलेल्या या यादीत अनेक गोष्टींची अजूनही भर टाकता येईल. बऱ्याच जणांना त्या कंजूषपणा दर्शविणाऱ्या वाटतील. आवश्यक असेल तर त्या नक्की कराव्यात त्यासाठी मागे-पुढे पाहू नये. हा समतोल साधत राहिल्यासच आपण सुजाण गुंतवणूकदार बनून आपल्या संपत्तीत भर घालू शकतो.

# सगरोळीत ग्रामदैवत शंभू महादेव मंदिराचे जिरणोव्दार शिवलिंग विरभद्र मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कळशारोहन सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**





बिलोली तालुक्यातील मौजे सगरोळी नगरीचे ग्रामदैवत असलेल्या शंभू महादेवाचे जिरणोव्दार गेल्या काही वर्षापासून चालू होते सदरील मंदिराचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर गेल्या सात दिवसापासून विविध धार्मिक कार्याच्या माध्यमातून मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कळशारोहन आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दि ३१ जाने २०२५ रोजी श्री श्री श्री १००८ जगद्गुरु भीमाशंकर लिंग शिवाचार्य महास्वामी केदार पीठ व सर्व शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत शंभू महादेव मंदिराचे जिरणोध्दार शिवलिंग वीरभद्र मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा बसवलिंग शिवाचार्य महाराज जुकलकर शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर सोमलिंग शिवाचार्य महाराज बिचकुंदेकर मल्लिकार्जुन शिवाचार्य महाराज खतगावकर सिद्ध दयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर शंकर लिंग शिवाचार्य महाराज हानेगावकर विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर चंद्रशेखर महाराज देगलूरकर बसवलिंग शिवाचार्य महाराज कौलासकर राजशेखर शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर आचार्य गुरुराज स्वामी अमदपुरकर सिद्धेश्वर महाराज सुकणीकर सिध्दायप्पा महाराज एकलारकर यांचे सर्व गुरुवर्य यांच्या उपस्थितीत व श्री.श्री. १००८ जगद्गुरु भीमाशंकर शिवाचार्य महास्वामी केदारपीठ यांच्या शुभहस्ते शंभू महादेव मंदिराचे व शिवलिंग विरभद्र मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा यामध्ये मुर्तीची स्थापना भगवान महादेव पिंड होम होवन, पाच नद्यांच्या जलाभिषेक करून शिवलिंग स्थापना करण्यात आली. विधी पुजा आर्चा करून विरभद्र मुर्तीचे प्राणप्रतिष्ठा कळशारोहन दैनीथीमान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, मुख्यमंत्र्याचे खाजगी सचिव बालाजी पा. खतगावकर, लक्ष्मण ठकरवाड, मधुजी गिरगांवकर, रोहित देशमुख गणेश पा.शिंपाळकर तर याचबरोबर राजकीय व सामाजिक पदाधिकारी व गावातील ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने बायलेकीची उपस्थिती होती. गावातून श्री श्री श्री १००८ जगतगुरु व सदगुरु भिमाशंकर शिवाचार्य महास्वामी केदारपिठ महाराज यांच्या भव्य शोभा याञेत गावातील महिलांनी डोक्यावर कळस घेऊन गुरुराज माऊली च्या घोषणाने पाऊल टाकत सहभागी झाले होती तर सकाळी ११ वा जगतगुरु भिमाशंकर केदारपिठ यांचे प्रवचन संपन्न झाल्यावर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आली होती. विशेष म्हणजे मंदिर समितीच्या संयोजक मंडळाने अतिशय चांगला मंदिर निर्माण करून सदरील मंदिराचा कार्यक्रम जगत गुरू सदगुरू केदारपिठ यांची उपस्थिती घडवून आणल्याबद्दल सगरोळी गावकऱ्यांचं परिसरातील नागरिक कौतुक करित आहेत.

## शिराढोण येथे अखंड हरिनाम सप्ताह,ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोण । दौलत पांडागळे**

कंधार तालुक्यातील शिराढोण येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वै .ह .भ .प . संभाजी महाराज ( मामा ) मारतळेकर यांच्या कृपा आशिवार्दाने विठ्ठलेश्वर मंदिर शिराढोण येथे दि २ फेब्रुवारी २०२५ ते दि ९ फेब्रुवारी २०२५ पर्यंत भागवत कथा चालणार असून दि ८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता गाथा पूजन , दुपारी ४ वाजता ग्रंथराज ज्ञानेश्वरी व श्रीमद् भागवत ग्रंथाची भव्य मिरवणूक गावातील प्रमुख रस्त्याने निघेल.या अखंड हरिनाम सप्ताह , ज्ञानेश्वरी पारायण , श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात आनंद भुजंगराव कुलकर्णी कोकलेगावकर यांच्या सुमधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रमात , ४ ते ६ काकडा आरती , सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण पारायण प्रमुख श्री गणपतराव पदरे गुरुजी , श्री गोविंद पांचाळ , श्री सुरेश इंगळे , ११ ते १२ गाथा भजन , दुपारी १ ते ५ श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी ७ ते ८ हरिपाठ , रात्री ९ ते ११ हरि किर्तन व नंतर हरिजागर होणार आहे. सप्ताहात दि . २ फेब्रुवारी रोजी श्री ह भ प आनंदा महाराज वळशिंगे , दि ३ फेब्रुवारी रोजी श्री ह. भ. प गजानन महाराज खरबी , दि ४ फेब्रुवारी रोजी श्री ह भ प दत्ता महाराज वळसंगवाडीकर , दि ५ फेब्रुवारी रोजी श्री ह भ प राम महाराज सुगावकर , दि ६ फेब्रुवारी रोजी श्री ह भ प संतोष महाराज येणकिकर , दि ७ फेब्रुवारी रोजी ह भ प श्री माधव महाराज वडगावे , दि ८ फेब्रुवारी रोजी श्री ह भ प गजानन दुधाटे , तर दि ९ फेब्रुवारी रोजी श्री ह भ प नामदेव शास्त्री जामकर यांचे सकाळी १० ते १२ काल्याचे किर्तन होईल. व नंतर सामूहिक महाप्रसाद वाटप होईल.

सप्ताहात पुंडलिक कपाळे, ज्ञानेश्वर कपाळे , बालाजी पांडागळे, माधव कपाळे , बाजीराव कपाळे , बालाजी कपाळे , भगवान पांडागळे , पंडित कपाळे , साईनाथ कपाळे , नागोराव पांडागळे , अमोल कनकदंडे , यांच्या वतीने अनदान करण्यात येणार आहे .

## परतुर जिल्हा जालना येथे लहूक्रांती संघर्ष सेना आढावा बैठकीत अनेकांनची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



सेनगाव तालुक्यातील हात्ता (नाईक )येथील रहिवासी असलेले सामाजिक कार्यकर्ते तथा ( पत्रकार )मोहन रामभाऊ कांबळे यांचे सामाजिक कार्य पाहून लहूक्रांती संघर्ष सेनेचे युवा प्रदेशाध्यक्ष मोहन कांबळे यांची परतुर जिल्हा जालना येथे आज दिनांक २ फेब्रुवारी वार रविवारी रोजी दुपारी तीन वाजता कार्यकर्ता आढावा बैठकीमध्ये सर्वानुमते लहूक्रांती संघर्ष सेना महाराष्ट्र उपाध्यक्षपदी मोहन कांबळे यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य संघटक पदी – विठ्ठल नाटकर,तर अशोक साबळे यांची महाराष्ट्र युवक प्रदेश अध्यक्ष पदी निवड तर कैलास काळे यांची मराठवाडा अध्यक्षपदी निवड तर विठ्ठल भारसाकळे यांची जालना कार्याध्यक्षपदी निवड तर सतीश थोरात यांची परतुर तालुका कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली असून लहू क्रांती संघर्षनेचे संस्थापक अध्यक्ष श्री राजू भाई कसबे यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी बाळू सौदागर, परमेश्वर जाधव, प्रसाद गायकवाड, अर्जुन भारसाकळे, मनेश वाव्हळ, मोहन भारसाकळे सुरेश कांबळे यांच्यासह लहू क्रांती संघर्ष सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते,

## बीआरटी मुळे अस्तित्वात आलेले पादचारी भुयारी मार्ग असुरक्षित; दुर्गंधीने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

नागरी समस्या अलीकडच्या काळात उग्र रूप धारण करत आहेत. अनेकदा तक्रारी होतात, पण समस्या 'जैसे थे' राहते. नागरिकांच्या या समस्यांना प्रातिनिधिक व्यासपीठ देऊन त्यांचे गाऱ्हाणे या व्यासपीठावर मांडणारा 'दैनिक लोकनेता न्युज नेटवर्क 'चा हा पुढाकारपुणे – नगर महामार्गासह मुख्य रस्ते प्रशस्त आहेत. चंदननगर येथे बीआरटी थांबा या ठिकाणी जाण्यासाठी व रस्ते ओलांडण्यासाठी पादचाऱ्यांच्या सोईसाठी पादचारी भुयारी मार्ग महापालिकेने निर्माण केले आहेत. मात्र, सुरक्षेचा अभाव, अस्वच्छता, गैरवर्तन, मद्यपींचा अड्डा असे ग्रहण या मार्गाला लागले आहे. मद्यप्राशन केलेल्या व्यक्ती भुयारी मार्गात झोपलेले असतात. त्यामुळे महिला व विद्यार्थिनींच्या दृष्टिने हा भुयारी मार्ग असुरक्षित होताना दिसत आहेत.

महापालिकेने सुरक्षित व सुरळीत वाहतुकीसाठी बीआरटी मार्ग केला होता.मुख्य रस्ता, बीआरटी मार्गिका, सेवा रस्ता, सायकल ट्रॅक, पदपथ अशी काही रस्त्यांची रचना आहे. रुंदी व रहदारी अधिक असल्याने थेट रस्ता ओलांडणे पादचाऱ्यांसाठी धोकादायक आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी या ठिकाणी भुयारी मार्ग निर्माण केला आहे. मात्र, सोय व सुरक्षेऐवजी गैरसोय आणि असुरक्षितताच अधिक आहे. त्यामुळे पादचारी नागरिक विशेषतः महिला व विद्यार्थिनी हैराण झाल्या आहेत. मद्यपी, अस्वच्छतेमुळे दुर्गंधीचा त्रास प्रत्येक ठिकाणी सहन करावा लागत आहे.



याकडे महापालिका व पोलीस प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. सुरक्षारक्षक नेमावेत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

**नागरिक काय म्हणताहेत ?**

ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले, विद्यार्थ्यांना भुयारी मार्गातून जाताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तेथून जाताना भीती वाटते. सुरक्षारक्षक नसतात. मद्यपी झोपलेले असतात. त्यामुळे दिवसाही तेथून जाताना भिती वाटते. मनात भीती कायम असते. रात्री दहानंतर भुयारी मार्गातून जाणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने सुरक्षारक्षक नियुक्त करावेत, अशी मागणी तेजश्री बाळासाहेब पऱ्हाड यांनी केली.

पुणे – नगर महामार्गावर बीआरटी मुळे अस्तित्वात आलेल्या भुयारी मार्गाचे फायदे कमी आणि तोटेच जास्त झाले आहेत. हा भुयारी मार्ग मद्यपींचा अड्डा बनलेला आहे. भुयारी मार्गाच्या जवळच मद्य विक्रीची दुकाने आहेत. त्यामुळे या भुयारी मार्गाचा वापर सामान्य नागरिकांपेक्षा मद्यपीच मोठ्या प्रमाणात करत आहेत. त्यामुळे भुयारी मार्गाचा वापर करणे नकोसे झाल्याचे येथून ये जा करणारे नागरिक म्हणाले.नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## शालेय सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना स्वत:ला सिद्ध करण्याची संधी–आ.जोरगेवार

### विद्या विहार स्कुल येथे स्नेहमील आणि सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शिक्षण ही केवळ पुस्तकांपुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची प्रक्रिया आहे. अशा विविध उपक्रमांमधून विद्यार्थी जीवन कौशल्ये शिकतात, संस्कार आत्मसात करतात आणि समाजातील जबाबदार नागरिक म्हणून घडतात. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो, संघभावना निर्माण होते आणि त्यांना स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळते, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

विद्या विहार स्कूल येथे स्नेहमीलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, शिक्षक विभागाचे आमदार सुधाकर अडबाले, सरदार पटेल मेमोरीअर ट्रस्ट चे अध्यक्ष विनोद तत्तात्रे, विद्या विहार स्कूल चे संचालक चंद्रा रेड्डी, शोभा रेड्डी, क्रिष्णा रेड्डी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, आजच्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातून त्यांची प्रतिभा आणि आत्मविश्वास स्पष्ट दिसून येतो. शाळेतील अशा उपक्रमांमुळेच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व बहरते. त्यांच्या नृत्य, गाणे, अभिनय आणि विविध सादरीकरणांतून त्यांनी आपली कला आणि मेहनतीचे दर्शन घडवले आहे.शिक्षक आणि पालक या दोघांची भूमिका विद्यार्थी घडवण्यात अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षक ज्ञानाचा प्रकाश देतात आणि पालक तो संस्कारात रूपांतरित करतात. विद्यार्थ्यांनीही आपले ध्येय निश्चित करून परिश्रमाने पुढे जायला हवे. शिक्षणासोबतच क्रीडा, कला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतल्यास त्यांचा सर्वांगीण विकास होतो. शिक्षण हा जीवनाचा मूलभूत आधारस्तंभ आहे आणि त्यासोबतच विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा आणि सामाजिक जाणीव यामध्येही उत्तम कामगिरी करणे गरजेचे आहे, असे ते यावेळी म्हणाले या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी आणि पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# ३८ व्या राष्ट्रीय खो खो महाराष्ट्राचा डबल धमाका;महिला व पुरूष संघाला सुवर्णपदक

> **सलग चार राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र पुरुष व महिला संघाने सुवर्णमय कामगिरी केली आहे. याचा मनस्वी आनंद होत आहे. यासाठी सर्व जिल्हा संघटना, राज्य शासनाचे क्रीडा खाते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, क्रीडा मंत्री भरणे यांचे मनापासून आभार मानतो. येणाऱ्या काळात होणाऱ्या स्पर्धामध्ये महाराष्ट्र अव्वल कामगिरी करीत राहील याची खात्री देतो. – डॉ.चंद्रजित जाधव, सचिव, महाराष्ट्र खो–खो असोसिएशन**





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**

३८ व्या राष्ट्रीय खो–खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला आणि पुरूष संघाने ओरिसाच्या दोन्ही संघांवर मात करत डबल धमाका साधला आहे. महिला आणि पुरूष संघानी सुवर्णपदकाला गवसणी घातली. या विजयामुळे महाराष्ट्र राज्य पदक तालिकेत प्रथम क्रमांकावर पोहोचला आहे.उत्तराखंड येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत झालेल्या महिलांच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने ओडिसावर चूरशीच्या सामन्यात ३ गुणांनी (३१–२८) असा पराभव केला. मध्यंतराला महाराष्ट्र कडे तीन गुणांची (१५–१२) आघाडी होती. दुसऱ्या सत्रात ती आघाडी कायम राखण्यात महाराष्ट्राला यश आले. त्यामुळे हा विजय सुकर झाला. विजयी महाराष्ट्रातर्फे प्रियंका इंगळ व इतर खेळाडूंनी विजयात मोलाची कामगिरी केली.

पुरूष गटात महाराष्ट्राने ओडिसाचा पराभव केला .उत्तराखंड येथे सुरू असलेल्या या नॅशनल गेम्समध्ये सर्व खेळात महाराष्ट्राच्या पथकाने चांगली कामगिरी बजावली आहे. खो–खो स्पर्धेतील यशामुळे पदक तालिकेत महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर पोहोचला आहे. आतापर्यंत १० सुवर्ण, १६ रौप्य, ११ कांस्य पदके मिळाली आहेत. खो–खो संघाने सुवर्णमय कामगिरी केल्याबद्दल दोन्ही संघाचे खेळाडू, प्रशिक्षक राजेंद्र साप्ते, पंकज चवंडे यांचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, महाराष्ट्र खो–खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक–निंबाळकर, सचिव प्रा. डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ड . गोविंद शर्मा यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य आणि खेळाडूंनी अभिनंदन केले आहे.

# ध्येयावर लक्ष केंद्रित करा;यश निश्चित मिळेल-गटविकास अधिकारी माधव केंद्रे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

विद्यार्थ्यांनो ध्येयावर लक्ष केंद्रित करा तुम्हाला यश निश्चित मिळेल असा आत्मविश्वास भोकर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी माधव केंद्रे यांनी बोलताना व्यक्त केला.ते तालुक्यातील श्रीक्षेत्र गणेश मंदिर पाळज येथे शिक्षण विभाग पंचायत समिती भोकर द्वारे आयोजित संकल्प शिष्यवृत्ती निवासी सराव अभ्यास वर्ग २०२५ या उपक्रमाच्या समारोप प्रसंगी बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी माधव केंद्रे,गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी प्रविण चाटलावार,सार्वजनिक गणेश मंडळाचे पदाधिकारी आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री गणेशाच्या व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे दीप प्रज्वलित करून पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की माणसाच्या जीवनात निश्चित ध्येय असावे लागते.एकदा ध्येयनिश्चित झाले की यशाच्या वाटा आपोआप मोकळ्या होतात व माणूस आपल्या क्षेत्रात यश संपादन करतो.हे पटवून देताना त्यांनी धनुर्धर अर्जुनाचा दृष्टांत दिला. जेव्हा त्यांचे गुरु द्रोणाचार्य आपले शिष्य असणारे कौरव पांडवांना धनुर्विद्येचे धडे देत होते तेव्हा एका झाडावरील पोपटाचा डोळा छेदायचा होता.त्यांनी प्रत्येकांना विचारले तुम्हाला काय दिसत आहे? तेव्हा अनेकांनी सांगितले झाड दिसत आहे,फळे दिसत आहेत, फांद्या दिसत आहेत व पोपट दिसत आहे असे उत्तर दिले.पण जेव्हा त्यांनी अर्जुनाला हाच प्रश्न विचारला तुला काय दिसत आहे? तेव्हा त्यांनी मला फक्त पोपटाचा डावा डोळा दिसत आहे असे उत्तर दिले. कारण त्यांनी ध्येय निश्चित केले होते.म्हणून तो जगात उत्तम धनुर्धर बनू शकला.त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनीही आपल्या जीवनात आपले ध्येय निश्चित करावे,यश आपोआप मिळेल असा आत्मविश्वास बोलताना व्यक्त केला.



या कार्यक्रमात साहित्यिक तथा नांदेड मनपाचे शिक्षण अधिकारी व्यंकटेश चौधरी यांनीही मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनो तुम्ही केवळ डॉक्टर इंजिनियर बनण्याचे स्वप्न पाहू नका.इतर प्रशासकीय क्षेत्रात तुम्हाला खूप मोठा वाव आहे.त्यात तुम्ही नाव कमवा व चांगले प्रशासकीय अधिकारी बना असे मार्गदर्शन केले.पुढे म्हणाले की जिल्हा परिषद शाळेत मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेतात.तेव्हा सर्व शिक्षकांनी त्यांना मन लावून शिकवावे व त्यांच्यावर चांगले संस्कार करावेत कारण संस्कारातूनच त्यांचे भावी आयुष्य फुलत राहणार आहे असे सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे यांनी करून दिनांक २७ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीतील एकूण ५४ विद्यार्थ्यांना हे निवासी शिष्यवृत्ती सराव अभ्यास वर्ग सार्वजनिक गणेश मंदिर संस्थांच्या मदतीने घेण्यात येऊन विद्यार्थ्यांना तज्ज्ञ शिक्षकाकडून अत्यंत मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या सराव परीक्षेत २०० पेक्षा जास्त मार्क घेऊन उत्तीर्ण झाल्यामुळे भविष्यात हे विद्यार्थी निश्चित शिष्यवृत्तीधारक बनतील असा आत्मविश्वास व्यक्त केला.हे निवासी शिष्यवृत्ती सराव अभ्यास वर्ग यशस्वी होण्यासाठी पाळज नगरीचे सर्व ग्रामस्थ,शिक्षक वृंद,मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख,शिक्षणविस्तार अधिकारी या सर्वांनी मोलाचे योगदान दिल्याने सर्वांचे त्यांनी जाहीर आभार मानले.या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन सहशिक्षक विपिन पवनकर यांनी केले तर आभार नरेंद्र जोशी यांनी मांनले. यावेळी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसाचे वाटपही करण्यात आले. या शिबिरात सक्रिय सहभाग नोंदवलेल्या सर्व शिक्षकांचा श्री गणेश मंदिर संस्थांच्या वतीने सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचे पालक,शिक्षक वृंद,विद्यार्थी,विद्यार्थिनी ग्रामस्थ व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी महाविद्यालयाच्या मुलींनी साकारले टेरेस गार्डन

## महाविद्यालयाच्या मुलींचे होत आहे सर्वत्र कौतुक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माळशिरस । बबनराव धायतोंडे**

डॉ.शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालय बारामती यांच्या वतीने कृषी कार्यानुभव या कार्यक्रमांतर्गत मौजे दहिगाव ता.माळशिरस येथे शाश्वत राहणीमान आणि शहरी बागकामाला प्रोत्साहन देण्यासाठी डॉ.शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी टेरेस गार्डनवर प्रात्यक्षिक आयोजित केले होते.या कार्यक्रमाचा उद्देश सहभागी लोकांना लहान जागेमध्ये स्वतःचे अन्न वाढवण्याचे फायदे आणि तंत्रज्ञान शिकवणे हा होता.

प्रा.गणेश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पुनर्नविकरण केलेले साहित्य,सेंद्रिय खते वापरून समृद्ध बाग कशी तयार करायची




याचे प्रात्यक्षिक कृषी कन्या कु.समृद्धी बोडके,मिनल माने,राजश्री सूर्यवंशी, संचिता डोंबाळे,दमयंती वनवे,मधुरा कोंडे,शितल शिंदे यांनी करून दाखवले. यावेळी कु.मिनल माने म्हणाली,की आम्हाला लोकांना दाखवायचे होते की, बागकाम हा केवळ छंद नसून शाश्वत भविष्यासाठी योगदान देण्याचा मार्ग आहे.असे तिने यावेळी विशद केले,टेरेस गार्डनमुळे कोणालाही स्वतःचे अन्न वाढवता येणे शक्य आहे.आणि निसर्गाशी असलेली नाळ जपण्याचा एक प्रयत्न यशस्वी होऊ शकतो आणि त्यामधून आपला आर्थिक फायदा देखील होऊ शकतो हे यातून दिसून आले.या उपक्रमासाठी स्थानिक रहिवाशांनी चांगली उपस्थिती दाखवली व त्यांनी या उपक्रमाचे खूप कौतुक केले.

# संघर्षातून निर्माण झालेलं कर्तुत्ववान व्यक्तिमत्व-चेअरमन राहुल करपे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

समाजातील तळागाळातील गोरगरीब, जनतेने असंख्य प्रश्न, समस्या, अडचणी सोडविण्यासाठी सदैव तत्पर असणारं व्यक्तीमत्व म्हणजे श्री.राहुल दादा करपे पाटील.नागरिकांच्या समस्यांचे निवारण, तत्काळ उपाययोजना, लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचविणे, विविध शासकीय दाखले व प्रमाणपत्रे, आपत्कालिन परिस्थितीत मदत यासाठी राहुल करपे यांचे जनसंपर्क कार्यालय सर्वसामान्यांचा आधार ठरत असून, एक कॉल प्रॉब्लेम सॉल्व्ह योजना यशस्वी ठरत असल्याच्या भावना नागरिकांनी व्यक्त केल्या.



टाकळी भीमा येथील युवा उद्योजक योगीराज उद्योग समूहाचे चेअरमन राहुल दादा करपे पाटील यांनी सामाजिक समरसतेचे भान ठेवत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडे वस्ती येथे लहान मुलांची व मुलींची अडचण व समस्या काही नागरिकांनी राहुल करपे यांना फोन करून कळवली असता ताबडतोब शाळेतील मुलांना दोन शौचालय बनवून देण्याचा निर्धार केला. ते काम आज पूर्णत्वाकडे जात आहे.यामुळे खेड्यातील एका वस्तीतील ही शाळा व या विद्यार्थ्यांची खास करून मुलींना होणारी अडचण कायमची दूर होणार आहे.

'एक कॉल प्रॉब्लेम सॉल्व्ह' या योजनेअंतर्गत हजारो नागरिकांची विकास कामे मार्गी लावली. त्यामध्ये शौचालय निर्मिती, रस्ता मुरमीकरण, कीटकनाशक फवारणी, पथदिवे दुरुस्ती, आरोग्य शिबीरे, बाल संगोपन योजना आदी परिसरातील विकास कामांचा समावेश आहे.या वेळी प्रतिक्रिया देताना राहुल करपे म्हणाले प्राथमिक शाळेतूनच मी घडलो आहे. त्याचा अभिमान आहे. शिक्षकांनी शालेय विद्यार्थ्यांची गरज ओळखून सुलभ शौचालय व मुतारीसाठी निधीची मागणी केली. त्याक्षणी आपण मदत जाहीर केली. यापुढेही अशाच प्रकारे शाळेला मदत करीन,' असे आश्वासन राहुल करपे यांनी दिले.यावेळी जिल्हा परिषद तोंडे वस्ती शिक्षक व नागरिकांनी आभार मानत कौतुक करत आहेत.समाजातील घटक राहुल दादा करपे पाटील यांचे मनोमन आभार मानत आहेत.

# दौंडच्या पत्रकार संघाचा क्रिकेट सामन्यात राजकीय पदाधिकारी संघावर प्रेक्षणीय विजय



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

शंभू महादेव प्रतिष्ठाण,राहु व आमदार राहुल कुल युवा प्रतिष्ठाण,राहू (ता.दौंड) यांच्या वतीने आयोजित आमदार चषक २०२५ - पुणे जिल्हा प्रीमियर लीगच्या निमित्ताने आज दौंड तालुक्यातील राजकीय पदाधिकारी विरुद्ध पत्रकार या संघांचा प्रेक्षणीय क्रिकेट सामना पार पडला यावेळी आमदार राहुल कुल यांनी उपस्थित राहून सामना पाहण्याचा आनंद घेतला.या सामन्यात पत्रकार संघ विजयी ठरला. आमदार राहुल कुल म्हणाले की गेली ३५ वर्षे मी व माझे क्रिकेटप्रेमी सहकारी सातत्याने राहु येथे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करत आहोत.सर्व सहकाऱ्यांनी अतिशय कष्टाने क्रिकेट स्पर्धेसाठी अतिशय उत्तम असे मैदान तयार केले आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुक केले व यावेळी विजेत्या ठरलेल्या पत्रकार मित्रांचे अभिनंदन केले.

## भाजपा संघटन पर्व प्रत्येकी १ हजार सदस्य नोंदणी केल्याबद्दल

# नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी दांपत्य यांचे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले अभिनंदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

आपल्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात लोहा शहरात विकासाची गंगा आणुन लोहा शहरात अनेक विकास कामे करून विक्रम करणारे लोहा नपा.चे लोकनियुक्त मा. नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी व त्यांच्या सुविद्य पत्नी नगरसेविका सौ. गोदावरीताई गजानन सुर्यवंशी यांनी भारतीय जनता पार्टी च्या सदस्य नोंदणी मध्ये ही मोठी आघाडी घेतली असून त्यांनी भाजपाच्या संघटन पर्वामध्ये प्रत्येकी १ हजार सदस्य नोंदणी केल्याबद्दल त्यांचे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभिनंदन केले.





पुढे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी व नगरसेविका सौ. गोदावरीताई गजानन सुर्यवंशी यांना दिलेल्या अभिनंदन पत्रात असे नमूद केले की, भारतीय जनता पार्टीच्या संघटन पर्वा मध्ये १००० सदस्य नोंदणी करुन त्यांना भारत देशाच्या पुनर्निर्माणाच्या प्रवासात सहभागी करून घेतल्या बद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन . भारतीय जनता पार्टी चे अत्योंदयाचे धोरण आपण जनमानसात घेऊन जात आहोत . यात आपली लोकांप्रती असलेली असलेली बांधिलकी आणि विचारप्रांती असलेली निष्ठा अधोरेखित होते. आपल्या या समर्पित योगदानाबद्दल पक्षाध्यक्ष म्हणून मला आदर आणि अभिमान वाटतो . आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताची मान जगभरात उंचावली आहे .तर आपले आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र थांबणार नाही, यांची सर्वांना खात्री आहे. संघटन पर्वामध्ये किमान एक हजार सदस्य भाजपा सोबत जोडून आपण संघटना बळकट केलीच आहे शिवाय महाराष्ट्राच्या विकासासाठीचे दूत ही आपण जोडून घेतले आहेत. आपल्या या योगदानाबद्दल आपले पुन्हा एकदा अभिनंदन असे नमूद करून पुष्पगुच्छ दिले आहे.


# सांघिक भावना वाढीसाठी खेळ महत्वपूर्ण-जिल्हाधिकारी विनय गौडा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये विविध प्रकारचे कलागुण व कौशल्य असतात. क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून हे कलागुण व कौशल्य दाखविण्यासाठी मंच उपलब्ध होत असतो. अशा स्पर्धांमधून अधिकारी व कर्मचारी एकत्रित आल्याने सांघिक भावना वाढण्यास मदत होत असून त्यासाठी खेळ महत्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले. जिल्हा क्रीडा स्टेडियम येथे आयोजित जिल्हास्तरीय महसूल क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी वरोराचे उपविभागीय अधिकारी जेनीथ चंद्रा, गोंडपिपरीच्या उपविभागीय अधिकारी अपूर्वा बासुर, परीविक्षाधीन जिल्हाधिकारी कश्मीरा संख्ये, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अतुल जटाळे, उपजिल्हाधिकारी शुभम दांडेकर, राजूराचे उपविभागीय अधिकारी रवींद्र माने, मूलचे उपविभागीय अधिकारी अजय चरडे, उपविभागीय अधिकारी संजय पवार तसेच महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, जिल्हा महसूल व क्रीडा स्पर्धा दरवर्षी आयोजित केल्या जातात. या निमित्ताने अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपले कलागुण आणि विशेष कौशल्य दाखविण्यासाठी मंच मिळतो.



**कौठा येथे प्रा मनोहर धोंडे सर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मोफत फार्मर आयडी काढून देण्यासाठी शिवा संघटना शाखा कौठा तर्फे कॅम्प चे आयोजन करण्यात आले त्याप्रसंगी शेतकरी बांधवानी चांगला प्रतिसाद दिला (लोकनेता न्युज नेटवर्क कौठा)**

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904